शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : आवेवा-१०९०/प्र.क्र.-१५२/आठ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ ऑक्टोबर, १९९०.

संदर्भ :- १] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०६९-डी, दिनांक २६.६.१९७०.

२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०७२/डी, दिनांक ११ फेब्रुवारी, १९७४.

३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०८१/१४३३/प्र.क्र.-११९/आठ, दिनांक २४.१२.१९८१.

४] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०८९/२८२९/प्र.क्र.-४०६/आठ, दिनांक ४ एप्रिल, १९९०.

५] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आवेवा-१०८९/४४/प्र.क्र. १३/आठ, दिनांक २ जून, १९९०.

शासन निर्णय :

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०७२-डी, दिनांक १२ फेब्रुवारी, १९७४ अनुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे पांच वर्षाचे गोपनीय अहवाल अत्युत्कृष्ट प्रतवारीचे असतील तर दोन आगाऊ वेतनवाढी व तीन वर्षाचे अत्युत्कृष्ट प्रतवारीचे असतील तर एक आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्यात यावी असे आदेश आहेत. आता या आदेशात किंचित बदल करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून गोपनीय अहवालांच्या खाली नमूद केलेल्या प्रतवारीनुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची आगाऊ वेतनवाढी/वेतनवाढ यासाठी शिफारस करण्यात यावी.

१] दोन ब आगाऊ वेतनवाढी ज्या वर्षात देण्याचा प्रस्ताव आहे त्या वर्षाच्या अलिकडचे पाचही वर्षाचे गोपनीय अहवाल अत्युत्कृष्ट [अ +] असावेत किंवा पाच पैकी किमान चार वर्षाचे अत्युत्कृष्ट [अ +] व उर्वरित एक वर्षाचा "निश्चित चांगला" [ब +] पेक्षा कमी दर्जाचा नसावा.

२] एक आगाऊ वेतनवाढ ज्या वर्षात देण्याचा प्रस्ताव आहे त्या वर्षाच्या अलिकडच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालपैकी किमान तीन वर्षाचे अत्युत्कृष्ट [अ +] आणि दोन वर्षाचे निश्चित चांगला [ब +] पेक्षा कमी दर्जाचे नसावेत.

३] ज्या शासकीय अधिकारी/कर्मचा-यांना आगाऊ वेतनवाढी देण्याचा प्रस्ताव विचाराधीन असेल त्यांची संख्या जर संवर्गनिहाय विहित ५ % प्रमाणकापेक्षा जास्त

सेल व जर त्यावेळी त्या कर्मचा-यांच्या गोपनीय अहवालांची प्रतवारी सारखीच असेल,
र अशावेळी ज्येष्ठतेनुसार आगाऊ वेतनवाढी देण्याचा विचार करण्यात यावा अन्यथा
निर्विवादपणे वरच्या दर्जाचे अभिलेख असणा-या कर्मचा-यांना/अधिका-यांना वरील [१]
व [२] मध्ये नमूद केल्याप्रमाणे आगाऊ वेतनवाढी देण्याचा विचार करण्यात यावा.

२. सदरचे आदेश दिनांक १.१०.१९८९ पासून लागू करण्यात येत आहेत.

३. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५३६/९०/सेवा-३, दिनांक ८ सप्टेंबर, १९९०. अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

[ भा. म. भणगे ]

उप सचिव, महाराष्ट्र शासन.